**CNR No. MHSI01-000114-2015**

## निशाणी ८२ खालील आदेश

अपेलंट यांनी रिस्पॉडंट नं. १(ब) यांचे वारस रेकॉर्डवर दाखल करुन घेण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडंट याने म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, रिस्पॉडंट नं. १(ब) श्रीहरी आप्पा कुंजरकर हे दिनांक ०७/११/२०२३ रोजी मौजे मसुरे, खाजनवाडी, ता. मालवण येथे मरण पावलेले आहेत. अपेलंट यांना कायद्याचे ज्ञान नसल्याने तसेच वारसांची नावे व पत्ते वेळेत उपलब्ध न झाल्याने कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास विलंब झालेला आहे. रिस्पॉडंट नं. १(ब) चे वारस दाखल करण्यास ५ महिने १७ दिवसांचा विलंब झालेला आहे. रिस्पॉडंट नं. १(ब) यांना १(ब)(१), १(ब)(२) व १(ब)(३) असे कायदेशीर वारस आहेत. सदर वारस दाखल करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. रिस्पॉडंट यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे की, अर्जातील सर्व मजकूर लबाडीचा व खोडसाळ असून त्यात काही तथ्य नाही. अपेलंट यांना मयताच्या वारसांची नावे पुर्वी माहिती होती. परंतु निष्काळजीपणा व हलगर्जीपणाने अपेलंट यांनी मुदतीत वारस रेकॉडवर आणलेले नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील रिस्पॉडंट याचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी रिस्पॉडंट नं. १(ब) यांचे वारस वेळेत अपिलमध्ये समाविष्ट केलेले नाहीत. त्यासाठी अपेलंट यांचे अर्जामध्ये कथन की त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्याने व वारसांची नावे व पत्ते वेळेत न मिळाल्याने वेळेत वारस दाखल करता आलेले नाहीत. रिस्पॉडंट नं. १(ब) यांचे वारस अपिलाकामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अपिलाचा अंतिम गुणदोषावर निकाल होण्यासाठी अपेलंट यांना संधी देणे योग्य व न्यायाचे होणारे आहे. त्यामुळे अपेलंट यांनी दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अपेलंट यांचा निशाणी ८२ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अपेलंट यांना आदेशीत करण्यात येते की, रिस्पॅाँडंट नं. १(ब) यांचे वारस १४ दिवसांच्या आत अपिलामध्ये घेऊन दुरूस्ती करावी व दुरूस्ती प्रत हजर करावी, तसे न केल्यास अर्ज हा आपोआप रद्द समजण्यात येईल.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.03.25 17:53:52 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– २५/०३/२०२६

( श्री. एस. एस. इंदलकर )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.